(६)

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक : ७ नोव्हेंबर, २०१६**
**परिपत्रक**

**क्रमांक: सिआरझेड-१२१५/१०९३/प्र.क्र.४०/१५/नवि-१२**

**विषय :- संरक्षण विभागाचे आस्थापनांचे सभोवताली बांधकाम कार्याचे नियंत्रणासाठी मार्गदर्शक सुचना.**

**संदर्भ :-** शासन, नगर विकास विभागाचे परिपत्रक
१)क्र. सिआरझेड-२०१२/प्र.क्र.२/१२/नवि-१२, दि.२१/२/२०१५
२) क्र.सिआरझेड-१२१५/१०९३/प्र.क्र.४०/१५/ नवि-१२, दिनांक ४/२/२०१६.
३) क्र.सिआरझेड-१२१५/१०९३/प्र.क्र.४०/१५/ नवि-१२, दिनांक २०/४/२०१६

संरक्षण विभागाच्या आस्थापनांलगतच्या जमिनीच्या विकासासंदर्भात संरक्षण विभागाने दि. १८/५/२०११ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, तद्नंतर स्थलसेनेने दि. ३/१०/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेले स्पष्टीकरण आणि संरक्षण विभागाचे एका प्रकरणी दिलेले दि. १४/१/२०१३ रोजीचे पत्र विचारात घेऊन, संरक्षण विभागाच्या मार्गदर्शक तत्वांची एकसमान (uniform) अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने व त्यामध्ये सुसुत्रता राहण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने यापुर्वी दि. ४/११/२०१० च्या पत्रान्वये केवळ बृहन्मुंबई क्षेत्रापुरते निर्गमित केलेले पत्र रद्द करुन, राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणे/ विशेष नियोजन प्राधिकरणे तसेच जिल्हाधिकारी यांना सर्वसमावेशक अशा मार्गदर्शक सूचना संदर्भाधिन परिपत्रकांद्वारे शासनाने दिल्या आहेत.

आता डेप्युटी डायरेक्टर (लॅण्डस), संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक २१/१०/२०१६ च्या परिपत्रकान्वये इमारत बांधकामाच्या संदर्भात दयावयाच्या ना-हरकत दाखल्याबाबत परिपत्रक निर्गमित केले असून, सदरच्या परिपत्रकाची छायाप्रत यासोबत जोडली आहे. त्यामुळे राज्य शासनाने यापूर्वी संदर्भाधिन परिपत्रकांन्वये दिलेल्या सर्व मार्गदर्शक सुचना रद्द करण्यात येत असून, संरक्षण मंत्रालयाने आता दिनांक २१/१०/२०१६ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार बांधकाम परवानगी संदर्भात कार्यवाही करण्यात यावी. त्यानुसार सदर

परिपत्रकाच्या Annexure-A मध्ये नमूद केल्याप्रमाणे नागपूर जिल्हयातील एक, जळगाव जिल्हयातील एक, पुणे जिल्हयातील एकूण सात, मुंबई मधील कलीना, ट्रॉम्बे, घाटकोपर, वडाळा, क्रॉस आयलँड, मालाड, कांदीवली या आस्थापना तसेच कोल्हापूर जिल्हयातील एक आणि औरंगाबाद जिल्हयातील एक या विवक्षित आस्थापनांपासून १० मी. अंतरामध्ये बांधकाम करण्यास निर्बंध ठेवण्यात आलेले आहेत.

उपरोक्त परिपत्रक तात्काळ अंमलात येईल व त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी.

(अविनाश पाटील)

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :-**

१) सचिव, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

२) संचालक (एल अँण्ड सी) संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

३) एयर ऑफीसर कमांडींग, एचक्यू, मेरीटाईम ,एयर ऑपरेशन, आय.ओ.एफ. बिल्डीग, महात्मा गांधी रोड, न्यू मरीन लाईन, मुंबई -४०० ०११.

४) अेव्हीएसएम, व्हीएसएम, फ्लॅग ऑफीसर कंमाडीग इन चिफ, वेस्टन नेव्हल कमांड, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई.

५) जनरल ऑफीसर कमांडीग हेड क्वॉर्टर्स, महाराष्ट्र अँण्ड गुजरात एरीया,कुलाबा, मुंबई-४०० ००५.

६) प्रधान सचिव, ऊदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा, मुंबई.

९) प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचना माहितीसाठी आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व जिल्हाधिकारी आणि इतर सर्व संबंधिताचे निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

१०) सचिव (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, नवी मुंबई.

१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, अंधेरी (पुर्व), मुंबई.